स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 01–10–2010 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 5. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 6. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 7. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |
| 8. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 10. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 11. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |
| 12. | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 13. | श्री. मधुकर नत्थुजी कांबळे | सदस्य |
| 14. | श्री. सतिश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 15. | श्री. राजेश रामचरण जरगर | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिति यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 260</u> :— वार्ड क्र. 109, येथील विवेकानंद शाळेजवळ विकास नगर येथे म.न.पा. स्पोर्टस कॉम्पलेक्सचे बांधकाम करण्यांकरीता तयार करण्यांत आलेल्या रु. 2,85,70,821/— चे प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांस तसेच प्रस्तावित बांधकामाचे तांत्रीक देखरेखी करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार म्हणून डिझायनर्स इनकॉरपोरेशन चे वास्तुशास्त्रज्ञ श्री. राजेश जोशी यांची महानगरपालिका प्रचलित दरावर नेमणूक करण्याकरीता मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 261</u> :— 1) नागपूर महानगरपालिका हद्दीतील अभिलेखावर असलेल्या मालमत्तेचे पुनर्मुल्यांकन / मुल्यांकन व नविन मालमत्ता शोधून मुलयांकनाचे काम करण्याकरिता खाजगी संस्थाना / तांत्रिक खाजगी कंपनींना Expression of Interest (EOI) बोलावून देण्याबाबत म.न.पा. ठराव क्र. 125 दि. 16.07.2010 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. या अनुषंगाने खालील दरानुसार हे काम खाजगी एजन्सी व्दारे करण्याचा व सदर्हु कामाकरिता येणारा खर्च रु. 290.40 लक्ष च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अ) मालमत्तेचे मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन कर आकारणी योग्य क्षेत्रफळ 2000 चौ.फुट किंवा 185.87 चौरस मिटर पर्यंत रु. 60 प्रति मालमत्ता .
ब) मालमत्तेचे मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन कर आकारणी योग्य क्षेत्रफळ 2001 ते 4000 चौ.फुट किंवा 371.74 चौरस मिटर पर्यंत रु. 80 प्रति मालमत्ता .
क) मालमत्तेचे मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन कर आकारणी योग्य क्षेत्रफळ 4001 व त्यावरील चौ.फुट किंवा 371.74 चौरस मिटर पेक्षा जास्त रु. 100 प्रति मालमत्ता.
ड) मालमत्तेचे मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन ( सर्व खुल्या भुखंडाकरीता ) कोणत्याही क्षेत्रफळाच्या खुल्या भुखंडाकरीता रु. 25 प्रति मालमत्ता .

2) तसेच हे काम खालील एजंन्सींना 10 ही झोनमध्ये विभागणी करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

| | एजंन्सीचे नांव | | |
|---|---|---|---|
| 1. | आरकिटेक अश्लेष श्रीखंडे, मे. अद्वैत, कंसोरटीयम, नागपूर | — | झोन क्र. 1 लक्ष्मीनगर |
| 2. | जितेंन्द्र दंडवानी, मे. स्टार कॉरपोरेशन, नागपूर | — | झोन क्र. 1 लक्ष्मीनगर |
| 3. | डी.आर.ए.—ए.डी.सी.सी., नागपूर | — | झोन क्र. 2 धरमपेठ |
| 4. | शार्पटेक इंजिनिअरींग , नागपूर | — | झोन क्र.3 हनुमान नगर |
| 5. | एल.नागराज , प्रो. कॉन्सुल, इलेन | — | झोन क्र.3 हनुमान नगर |

असोसिएटस, बंगलोर

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | अमोल डी. गोतमारे ॲन्ड असोसिएटस्, नागपूर | – | झोन क्र.4 धंतोली |
| 7. | निर्को ग्रुप , नागपूर | – | झोन क्र. 5 नेहरुनगर |
| 8. | कोलब्रो ग्रुप , नागपूर | – | झोन क्र. 5 नेहरुनगर |
| 9. | एन.व्ही. इंटरप्रायझेस , नाशिक | – | झोन क्र. 6 गांधीबाग |
| 10. | प्रविण राज इंटरप्रायजेस , नागपूर | – | झोन क्र. 7 सतरंजीपुरा |
| 11. | आनंद मुकुंद गद्रे, नागपूर | – | झोन क्र. 8 लकडगंज |
| 12. | अपर्णा एस.आळती , नागपूर | – | झोन क्र. 8 लकडगंज |
| 13. | विजय एस.बागडे , नागपूर | – | झोन क्र. 9 आशिनगर |
| 14. | उज्वला एम. जोसेफ , नागपूर | – | झोन क्र. 9 आशिनगर |
| 15. | राजेश्वरी आर. बोरकर, नागपूर | – | झोन क्र. 10 मंगळवारी |
| 16. | दिलीप एस.बालपांडे , नागपूर | – | झोन क्र. 10 मंगळवारी |
| 17. | सी ई टी बिल्ड असोसिएटसफ , नागपूर | | झोन क्र. 10 मंगळवारी |

कामाचे आवंटन करण्यात आलेल्या एजंन्सी मधुन वेळेवर एखादी एजंसी काम करण्यास असमर्थ असेल किंवा काम करित नसेल किंवा काम अर्धवट सोडून जात असेल अश्या परिस्थितीत इतर झोन मध्ये पात्र असणाऱ्या एजंन्सी मधुन जर कोणी इच्छुक असेल त्या मा. निगम आयुक्त यांचे आदेशान्वये सदर्हु काम देण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील प्रमाणे त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. निविदेमधील सहभागी सर्व निविदाकारास फक्त भुखंड व मालमत्ता सर्व्हेक्षणाचा अधिकार राहील.
2. मालमत्तेची कर आकारणी झाल्यावर व मंजूरी प्राप्त झाल्यावर त्याची संगणकात नोंद घेवून प्रतिवृत्त व नोटीस इत्यादीचे अधिकार कार्यालयाचे राहील.
3. पुनर्मुल्यांकनाचे व कर आकारणीचे नोटीस तामिल करण्याचे काम निविदाकाराचे राहील.
4. निविदाकाराने केलेल्या सर्व्हेक्षणाच्या कामाची फेर तपासणी विभागाचे अधिकारी व कर्मचारी करतील. केलेल्या कामात तृटी अथवा दोष आढळून आल्यास रु. 1/– प्रति चौ. फुट. या प्रमाणे शास्ती (दंड) आकारण्यात येईल.
5. निविदाकाराच्या कामाचे देयक मालमत्ता धारकास पुनर्मुल्यांकन/कर आकारणी नोटीस तामिल केलेल्या तारखेपासून 1 महिन्यानंतर देण्यात येईल. परंतू काही कर आकारणीच्या प्रकरणात आक्षेप दाखल झाल्यास अशी प्रकरणे देयकातून वगळून आक्षेपाच्या निर्णयानंतर त्याचे भुगतान करावे.
6. म.न.पा. क्षेत्रातील सर्व नागरीकांना काम सुरु करण्यापूर्वी याबाबत ची माहिती व कार्याची पध्दती जाहिरातीद्वारे प्रसारित करण्याचे काम विभागाचे राहील.

7. सर्व्हेक्षणाच्या कामाकरीता जाणाऱ्या निविदाकारांच्या कर्मचाऱ्यांना क्षेत्रिय कार्यालयामार्फत ओळखपत्र देणे विभागास बंधनकारक राहील.
8. निविदाकारांनी केलेल्या कामाचा प्रगती अहवाल प्रत्येक महीन्यात स्थायी समितीला सादर करणे कार्यालयास बंधन कारक असेल.

वरील सर्व अटी व शर्ती निविदाकारास कार्यादेश देण्यापूर्वी करारनाम्यात नमुद करणे कार्यालयास बंधन कारक राहील, या अटीसह विषय एकमताने मंजूर.

तसेच मुळ प्रस्तावाचे कार्यालयाद्वारे कार्यान्विकरण झाल्यावर खालील प्रमाणे कर आकारणी न झालेल्या मालमत्ता निविदाकाराने लवकरात लवकर शोधून काढून त्या कर आकारणीत आणल्यास व त्यामुळे म.न.पा.च्या उत्पन्नात वाढ होत आहे. असे कार्यालयीन तपासणीत आढळून आल्यास अशा निविदाकारास प्रोत्साहन म्हणून रु. 1/— प्रति. चौ. फुट कर आकरणी योग्य बांधकामाच्या क्षेत्रफळावर तसेच खुल्या भुखंडावर रु. 0.25 प्रति. चौ. फुट क्षेत्रफळावर प्रमाणे देण्याची शिफारस ही स्थायी समिती करते. प्रोत्साहनपर देण्यात येणाऱ्या राशीचा प्रस्ताव कार्यालयाने म. न.पा. सभागृहा समोर सादर करुन सभागृहाकडुन मंजूर करुन घ्यावा यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

<u>ठराव क्रमांक 262</u> :— वार्ड क्र. 71, मध्ये श्री. अरमरकर, कुंभारपुरा, गरुडखांब, धारस्कर रोड, सुदामगल्ली श्री. जोशी, गजानन मंदिर परिसरात सी.सी. पेव्हमेंट व आय ब्लॉक बसविण्याचे कामास्तव रु. 18,36,582/— रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 263</u> :— वार्ड क्र. 28, पुनापूर रोड येथे भवानी मंदिर गेट ते नाग नदीपर्यंत रस्त्याच्या डांबरीकरणाचे कामास्तव रु. 15,01,192/— रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 264</u> :— वार्ड क्र. 45, सुरेंद्रगढ मुख्य रस्ता व्हेटरनरी चौका पासून ज्योती किराणा पर्यंतच्या रस्त्याचा विकास करण्यास्तव रु. 49,99,300/— रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 265</u> :— वार्ड क्र. 104, अंतर्गत बजरंग नगर व विश्वकर्मा नगर येथे गडर लाईन (भुमिगत लाईन) चे कामास्तव रु. 11,99,500/— रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 266</u> :– वार्ड क्र. 57, कुतुबी कॉलनी व लाल नगर येथील रस्त्याच्या डांबरीकरणास्तव रु. 12,07,950/– रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 267</u> :– वार्ड क्र. 131, मधील प्रगती कॉलनी, वैभव नगर, किर्तीनगर व सर्वश्रीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रु. 14,99,455/– रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 268</u> :– वार्ड क्र. 57, येथे शांतीनगर नाल्याची भिंत बांधणे व फुट ब्रीज चे बांधकामास्तव रु. 19,99,850/– रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 269</u> :– वार्ड क्र. 92, हनुमान नगर येथील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 14,97,500/– रकमेच्या प्राकलनास वित्तीय मान्यतेसह, प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

अध्यक्ष :– आजच्या सभेची विषय पत्रिका सर्व विभाग प्रमुखांना पाठविण्यांत येऊन सुध्दा बरेच विभाग प्रमुख आज वेळेवर सभेला उपस्थित झाले नाही. ही बाब कार्यालयीन शिस्तिचा भंग करणारी ठरते. तरी जे विभाग प्रमुख आजच्या सभेला वेळेवर उपस्थित झालेले नाही, अश्या सर्व विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्याचे उत्तर मला सादर करावे.

<u>ठराव क्रमांक 270</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर